## केंद्रीय मंत्रिपरिषदेची साडेचार तास मॅरेथॉन बैठक

# पश्चिम आशियातील संकटाच्या परिणामांचा आढावा?

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



**२०४७ मध्ये भारताला विकसित देश बनवण्याचे उद्दिष्ट ही केवळ घोषणा नाही. हा संकल्प पूर्ण करण्यालाच प्राधान्य दिले पाहिजे, असेही मोदींनी मंत्र्यांना सांगितल्याचे कळते.**

**नवी दिल्ली :** केंद्रीय मंत्रिपरिषदेच्या तब्बल साडेचार तास चाललेल्या मॅरेथॉन बैठकीत गुरुवारी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी प्रशासनातील कार्यक्षमता, निर्णयांची जलद अंमलबजावणी आणि पश्चिम आशियातील संकटाच्या आर्थिक परिणामांचा आढावा घेतल्याचे समजते.

रालोआ सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील मंत्रिपरिषदेची ही पहिलीच बैठक होती. संध्याकाळी पाच वाजता सुरू झालेली बैठक रात्री साडेनऊनंतर संपली. या बैठकीला केंद्रीय मंत्री, स्वतंत्र प्रभार असलेले राज्यमंत्री आणि राज्यमंत्री उपस्थित होते. बैठकीमध्ये पश्चिम आशियातील संकटामुळे उद्भवलेल्या आर्थिक परिणामांचाही आढावा घेण्यात आला. त्याअनुषंगाने ऊर्जा, कृषी, खत, विमान वाहतूक, शिपिंग आणि लॉजिस्टिक्स या क्षेत्रांवर चर्चा झाली. यासंदर्भात केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांचा उच्चस्तरीय अनौपचारिक मंत्रीगट परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. राजनाथ सिंह दक्षिण कोरियात असल्यामुळे ते बैठकीला उपस्थित नव्हते. केंद्रीय परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी मोदींच्या पाच देशांच्या दौऱ्यासंदर्भात माहिती दिल्याचे कळते.

बैठकीत कृषी, वन, कामगार, रस्ते वाहतूक, कॉर्पोरेट व्यवहार, परराष्ट्र, वाणिज्य आणि ऊर्जा मंत्रालयांसह इतर अनेक मंत्रालयांनी आतापर्यंत केलेल्या कामांची माहिती दिली आणि भविष्यातील आराखडाही सादर केला. निती आयोगाच्या वतीनेही सादरीकरण करण्यात आले. पुढील महिन्यात रालोआ सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळाला दोन वर्षे पूर्ण होत असताना झालेली ही बैठक केंद्र सरकारच्या कामगिरीचा एकप्रकारे मध्यावधी आढावा मानली जात आहे.

मोदींनी मंत्र्यांना अधिक कार्यक्षम होण्याची सूचना केल्याचे समजते. आपापल्या मंत्रालयांच्या निर्णय प्रक्रियेला अधिक गती देणे, तसेच प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याचाही सल्ला दिला. मंत्र्यांनी कुठल्याही वादापासून दूर राहिले पाहिजे, असेही मोदींनी मंत्र्यांना सांगितल्याचे समजते. गेली १२ वर्षे आपले सरकार केंद्रात असून पूर्वी काय झाले याचा विचार करण्यापेक्षा आगामी काळात काय करता येईल यावर भर दिला पाहिजे. २०४७ मध्ये भारताला विकसीत देश बनवण्याचे उद्दिष्ट ही केवळ घोषणा नाही. हा संकल्प पूर्ण करण्यालाच प्राधान्य दिले पाहिजे, असेही मोदींनी मंत्र्यांना सांगितल्याचे कळते.

## उल्हासनगरमध्ये गोळीबारात सख्ख्या भावांचा मृत्यू

**उल्हासनगर :** शहरातील कॅम्प ५ परिसरात गुरुवारी रात्री जुन्या वादातून झालेल्या गोळीबारात अनिल चौहान (२२) आणि अमन चौहान (१७)या सख्ख्या भावांचा मृत्यू झाला, तर त्यांचे चुलते अर्जुन चौहान जखमी झाले असून त्यांची प्रकृती चिंताजनक आहे.

कैलाश कॉलनी चौकात गुरुवारी सायंकाळी आठच्या सुमारास ७ ते ८ जणांचे टोळके हत्यारांसह आले आणि त्यांनी चौहान कुटुंबीयांवर थेट गोळीबार सुरू केला. प्राथमिक पोलीस तपासानुसार हा हल्ला अंबरनाथमधील कुख्यात गुंड आणि कॉलनीतील स्थानिक रहिवाशांमधील जुन्या वैमनस्यातून झाल्याचे समोर येत आहे. या हल्ल्यात सामील असलेल्या संशयितांपैकी तिघे जण यापूर्वीही हत्येच्या गुन्ह्यात अडकले होते आणि सध्या ते जामिनावर बाहेर आहेत. हल्लेखोरांच्या शोधासाठी चार पथके रवाना करण्यात आली आहेत, अशी माहिती पोलीस उप आयुक्त सचिन गोरे यांनी दिली.


### स्विस चॅलेंज प्रक्रियेअंतर्गत हमीपत्रांच्या (वैयक्तिक आणि कॉर्पोरेट हमीपत्रे) हस्तांतरणासंदर्भात स्वारस्याची अभिव्यक्ती ('ईओआय') मागवणारी जाहिरात

बॉब कॅपिटल मार्केट्स लिमिटेड (**'बॉबकॅप्स'**), प्रक्रिया सल्लागार म्हणून, यांची नियुक्ती स्टेट बँक ऑफ इंडिया (**'एसबीआय'**) यांनी कर्जदात्यांच्या संघाच्या (सामूहिकपणे **'कर्जदाते'** म्हणून ओळखले जाणारे) वतीने केली आहे, सदर ही नियुक्ती, कर्जदात्यांनी ई-ईएसआयएलला दिलेल्या पतसुविधा सुरक्षित करण्यासाठी, आधीच्या एस्सार स्टील इंडिया लिमिटेड ('ई-ईएसआयएल') यांच्या प्रवर्तक गटाने जारी केलेल्या हमीपत्रांच्या (**'ई-ईएसआयएल हमीपत्रे'**) हस्तांतरणासाठी स्विस चॅलेंज पद्धती (**'एससीएम'**) अंतर्गत बोली प्रक्रियेचे व्यवस्थापन करण्याकरिता करण्यात आली आहे. सदर हे हस्तांतरण **'संपूर्ण रोख'**, **'जसे आहे तसे आहे'**, **'जे आहे ते जसे आहे तसे'**, **'जसे आहे तसे आहे'**, **'तिथे जे काही असेल ते'**, आणि **'कोणत्याही दाव्याशिवाय'** या तत्त्वावर प्रस्तावित आहे. ई-ईएसआयएल यांना दिवाळखोरी आणि नादारी संहिता, २०१६ अंतर्गत सीआयआरपीमध्ये दाखल करण्यात आले आणि त्यानंतर त्याच्या ठराव योजनेला मंजुरी मिळाल्यामुळे आर्सेलर मित्तल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (**'एएमआयपीएल'**) यांच्याद्वारे त्याचे अधिग्रहण करण्यात आले. एएमआयपीएलच्या ठराव योजनेत ई-ईएसआयएल हमीपत्रांच्या हस्तांतरणाला स्पष्टपणे वगळण्यात आले होते, आणि कर्जदारांनी थकीत शिल्लक रक्कम वसूल करण्यासाठी त्यांची अंमलबजावणी करण्याचा अधिकार राखून ठेवला होता. कर्जदार आता सदर या ई-ईएसआयएल हमीपत्रांचे हस्तांतरण करण्यास इच्छुक आहेत. बॉबकॅप्स, कर्जदात्यांच्या वतीने, याद्वारे ई-ईएसआयएल हमीपत्रांच्या हस्तांतरणासाठी स्वारस्याची अभिव्यक्ती (**'ईओआय'**) आमंत्रित करत आहे.

| | |
|---|---|
| **ईओआय सादर करण्याची अंतिम तारीख** | २६ मे, २०२६ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत. |
| **योग्य तपासणीसाठी व्हीडीआरमध्ये प्रवेश** | दि. २९ मे २०२६ ते दि. १६ जून २०२६, सायं. ५.०० वाजेपर्यंत |
| **मुख्य बोली लावणाऱ्याकडून मिळालेला प्रस्ताव** | भारतीय रु. २००.०० कोटी (रुपये दोनशे कोटी फक्त) |
| **परतावायोग्य सहभाग शुल्क (आरपीएफ)** | भारतीय रु. १०.०० कोटी (रुपये दहा कोटी फक्त) |
| **अँकर बोलीच्या @ ५% किमान मार्कअप** | भारतीय रु. १०.०० कोटी (रुपये दहा कोटी फक्त) |
| **बोलीची सुरुवातीची किंमत** | भारतीय रु. २१०.०० कोटी (रुपये दोनशे दहा कोटी फक्त) |
| **बोली वाढीची रक्कम (बोली गुणक)** | किमान भारतीय रु. २.०० कोटी (रुपये दोन कोटी फक्त) आणि त्याच्या पटीत |
| **ई-लिलावाची तारीख** | १७ जून, २०२६ |
| **सर्वाधिक बोली लावणाऱ्याकडून इसारा ठेव अनामत रक्कम (ईएमडी)** | सर्वाधिक बोली लावणाऱ्याने सादर केलेल्या बोली मूल्याच्या १०% |

सविस्तर माहितीसाठी, इच्छुक निविदाकारांनी प्रोसेस ॲडव्हायझर यांची वेबसाईट www.bobcaps.in/tenders याला भेट द्यावी. कोणत्याही स्पष्टीकरणासाठी, कृपया खालील व्यक्तींशी संपर्क साधा:

| संपर्क व्यक्ती | टेलि. क्र. | ई-मेल-आयडी |
|---|---|---|
| श्री. सागर भद्रा, ए.व्ही.पी.- बॉबकॅप्स | +९१ ७६६६४१२३९५ | project.gamma@bobcaps.in |
| श्रीमती मैत्री शेठ, व्यवस्थापक- बॉबकॅप्स | +९१ ९८६७९३९३०३ | |

कर्जदाते कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता प्रस्तावित कामातून माघार घेण्याचा, तसेच त्यांच्या पूर्ण विवेकानुसार कोणतीही बोली स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार राखून आहेत.

ठिकाण: मुंबई
दिनांक: २२ मे, २०२६

BOBCAPS TRUST | INNOVATION | EXCELLENCE (A wholly owned subsidiary of Bank of Baroda)

द्वारे जारी
बॉब कॅपिटल मार्केट्स लिमिटेड
ई-ईएसआयएल यांच्या कर्जदात्यांच्यावतीने


## मदरशांमध्ये 'वंदे मातरम' सक्तीचे

### बंगाल सरकारच्या निर्णयामुळे वादाची चिन्हे

पीटीआय, कोलकाता

**पश्चिम बंगालमधील** सर्व मदरशांमध्ये 'वंदे मातरम'चे गायन सक्तीचे करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य सरकारच्या आदेशानुसार हा निर्णय तत्काळ अमलात आणला जाणार आहे. सुवेंदू अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली राज्यात भाजपचे सरकार स्थापन झाल्यानंतर आठवडाभरात मदरसा शिक्षण संचालनालयाने यासंबंधीचा आदेश जारी केला आहे.

''वर्ग सुरू होण्यापूर्वी प्रार्थनांदरम्यान 'वंदे मातरम' यापुढे अनिवार्य केले जात आहे,'' असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे. या अधिसूचनेवर कार्यवाही करण्यासाठी ती जिल्हा न्यायदंडाधिकारी, शाळांचे जिल्हा निरीक्षक, पश्चिम बंगाल मदरसा शिक्षण मंडळ आणि अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांना वितरीत करण्यात आली. गेल्याच आठवड्यात राज्य सरकारने सर्व सरकारी आणि अनुदानित शाळांमध्ये सकाळच्या प्रार्थनांमध्ये 'वंदे मातरम'चा समावेश अनिवार्य करण्याचे निर्देश दिले होते.

> तृणमूल काँग्रेसने राज्यातील शिक्षण व्यवस्था नष्ट केली आहे. या क्षेत्राची पुनर्बांधणी करण्याला राज्य सरकारचे प्राधान्य असायला हवे. पण शाळांमध्ये कोणती गीते गायली जावीत, यातच प्रशासनाला अधिक रस आहे.
>
> **- सुजन चक्रवर्ती,** ज्येष्ठ नेते, माकप

**विरोधकांची टीका**

राज्य सरकारच्या या निर्णयाचे तीव्र पडसाद उमटले आहेत. राज्यातील शिक्षणाचा दर्जा घसरत असताना त्यावर काम करण्याऐवजी सरकार केवळ प्रतीकांवर भर देत असल्याची टीका माकपने केली आहे. तर हा निर्णय चुकीचा असल्याचे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रदीप भट्टाचार्जी यांनी म्हटले आहे. 'वंदे मातरम' हे राजकीय चळवळ आणि निदर्शनांशी संबंधित राहिले आहे, असे ते म्हणाले. हा निर्णय घेण्यापूर्वी मदरशांच्या शिक्षकांशी चर्चा करून त्यांच्यावर हा निर्णय सोपवायला हवा होता, अशी सूचना त्यांनी केली.

## खरीप हंगामावर संकट

*(पान १ वरून)*

खतटंचाईची स्थिती आहे. राज्याला खरीप हंगामात ४८.८० लाख टन खतांचा साठा मंजूर आहे, त्यापैकी २५.४९ लाख टन खतांचा साठा उपलब्ध आहे. हंगाम सुरू झाल्यानंतर खतांचा आणखी पुरवठा होईल. तरीही हंगामात खतांची टंचाई काही प्रमाणात राहील, अशी स्थिती आहे. कृषी विभागाच्या वतीने उपलब्ध खतांच्या वितरणात सुसूत्रता आणली जाईल. खतांचे लिंकिंग, काळाबाजार, साठेबाजी रोखण्यासाठी कठोर कारवाई सुरू आहे. आतापर्यंत ४०० खत विक्रेत्यांचे परवाने रद्द आणि निलंबित करण्याची कारवाई केली आहे. बियाणांबाबत समाधानकारक स्थिती आहे. राज्याला गरज सुमारे २०.१६ लाख क्विंटलची आहे, तर उपलब्धता २८.१४ लाख टनांची आहे. बियाणांची उपलब्धता १३९ टक्के आहे, असेही फडणवीस म्हणाले.

**कृषी निर्यातीत राज्य पहिल्या क्रमांकावर**

कृषी निर्यातीत महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे. देशातून होणाऱ्या एकूण निर्यातीपैकी ७३ टक्के आंबा, ९४ टक्के द्राक्ष, ८५ टक्के डाळिंब, ८६ टक्के केळी, ८५ टक्के कांदा, ३३ टक्के आंबा पल्पची निर्यात राज्यातून होते. कृषी निर्यातीला आणखी प्रोत्साहन देण्यात येईल. नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना (पोकरा), बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) आणि महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्पातून निर्यातीला चालना दिली जात आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

**शेतकऱ्यांसाठी सरकारचे ॲप**

महाविस्तार ॲपची पुढील आवृत्ती 'महाविस्तार २.०'

शेतकऱ्यांना पिकांबाबत सल्ला देणारी वसुधा एआय सेवा आणि सक्रिय पीक सल्ला प्रणाली, अनुदान वितरणात पारदर्शकता आणणारी पी- सीबीडीएस प्रणाली सेंट्रल डिजिटल करन्सी, शेतकऱ्यांना पीक सल्ला देणारी क्रॉपसॅप २.० आणि कृषी उत्पादनांची सविस्तर माहिती देणारी महाट्रेस या ॲपचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन झाले. कृषी क्षेत्राला आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता यांची जोड दिली जाईल, असेही फडणवीस यांनी जाहीर केले.

## 'एक्स' खाते बंदीनंतरही 'झुरळां'च्या पक्षाची भरारी

*(पान १ वरून)*

अभिजित दिपके याने १६ मे रोजी 'कॉक्रोच जनता पार्टी' नावाने डिजिटल खाते सुरू केले. त्यानंतर अवघ्या चार दिवसांत 'सीजेपी' इंटरनेटवरील सर्वाधिक चर्चेचा विषय ठरत आहे. 'सीजेपी'च्या इन्स्टाग्राम खात्यावरील फॉलोअर्सची संख्या दीड कोटींपर्यंत पोहोचली असून 'एक्स'वरही दोन लाखांहून अधिक जण या 'पक्षा'शी जोडले गेले. यात अनेक राजकारणी, कलाकार, सामाजिक कार्यकर्ते आणि बहुसंख्य तरुणांचा समावेश आहे. मात्र, गुरुवारी अचानक 'सीजेपी'चे 'एक्स'चे खाते रोखून ठेवण्यात आले. 'आमच्या खात्यात दररोज हजारो सदस्य जोडले जात होते. याची सरकारला धास्ती वाटते,' असे सांगत अभिजितने 'कॉक्रोच इज बॅक' नावाने नवीन खाते सुरू केले. त्यालाही सायंकाळपर्यंत उदंड प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले.

विनोदी मीम्स, आकर्षक ग्राफिक्स, रॅप गीते, राजकीय भाष्य यांमुळे अवघ्या चार दिवसांत 'सीजेपी'हा समाजमाध्यमांवरील लोकप्रिय ट्रेंड ठरत आहे. बेरोजगारी, पेपरफुटी, शैक्षणिक समस्या, भ्रष्टाचार यासारख्या विषयांवर भाष्य करण्यात येत असल्याने 'सीजेपी'ला तरुणवर्गाचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे अभिजित याने या डिजिटल 'पक्षा'चे संकेतस्थळ निर्माण करून सदस्यनोंदणीही सुरू केली आहे. त्याद्वारे चार लाख तरुण या पक्षाचे सदस्य बनल्याचे तो म्हणाला.


GODREJ CONSUMER PRODUCTS

### गोदरेज कन्झ्युमर प्रोडक्ट्स लिमिटेड

गोदरेज वन, ४था मजला, पिरोजशानगर, ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, विक्रोळी (पूर्व), मुंबई- ४०००७९.
टेलि.: २५१८८०१०/२०/३०, फॅक्स: २५१८८०४०
ई-मेल: investor.relations@godrejcp.com, वेबसाइट: www.godrejcp.com
CIN : L24246MH2000PLC129806

**इन्व्हेस्टर एज्युकेशन ॲण्ड प्रोटेक्शन फण्ड (आयईपीएफ) अकाऊंटमध्ये इक्विटी भागांच्या स्थानांतरणाकरिता कंपनीच्या भागधारकांकरिता सूचना (कंपन्या अधिनियम, २०१३ च्या कलम १२४(६) नुसार)**

इन्व्हेस्टर एज्युकेशन ॲण्ड प्रोटेक्शन फण्ड (''आयईपीएफ'') ऑथोरिटी (अकाऊंटिंग, ऑडिट, ट्रान्सफर व रिफंड) रुल्स, २०१६ (''रुल्स'') [त्याकरिता समाविष्ट कोणतेही फेरबदल/ सुधारणा/ पुनर्रचना] यासह वाचलेल्या कंपन्या अधिनियम, २०१३ च्या कलम १२४(६) च्या आवश्यकतांच्या अनुसार, कंपनीला केंद्र सरकारद्वारा स्थापित ''आयईपीएफ अकाऊंट''मध्ये भागांचे स्थानांतरण करणे आवश्यक आहे, जे लाभांश सलग ७ (सात) वर्षांच्या कालावधीकरिता प्रदान न होता किंवा दावा न करता राहिले आहेत.

सूचना याअधिक देण्यात आली आहे की, कंपनीची ''आरटीए'', ''एमयूएफजी इन्टाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड'' (पूर्वीची लिंक इन्टाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड) संबंधित भागधारकांना, ज्यांचे लाभांश सलग ७ (सात) वर्षांकरिता दावा न करता पडून आहेत, आणि ज्यांचे भाग **०६ सप्टेंबर, २०२६** रोजी किंवा तत्पूर्वी ''आयईपीएफ''कडे स्थानांतरणास पात्र असणार आहेत, कंपनीच्या ''आरटीए''कडे उपलब्ध असलेल्या त्यांच्या शेवटच्या ज्ञात/ नोंदणीकृत पत्त्यावर वैयक्तिकरीत्या पत्रव्यवहार पाठवत आहे. सदर भागधारकांची यादी, ज्यांनी सलग ७ (सात) वर्षांकरिता त्यांचे लाभांश वटवले नाहीत आणि ज्यांचे इक्विटी भाग त्यामुळे ''आयईपीएफ अकाऊंट''मध्ये स्थानांतरणास पात्र आहेत, https://www/godrejcp.com/investors/investor-information/unclaimed-dividend या कंपनीच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे.

भागधारकांना विनंती करण्यात आली आहे की, त्यांनी उशिरात उशिरा **१० ऑगस्ट, २०२६** पर्यंत दावा न केलेली लाभांश रक्कम व इक्विटी भागांस दावा करण्याकरिता कंपनीचे रजिस्ट्रार ॲण्ड शेअर ट्रान्सफर एजन्ट (''आरटीए'') म्हणजेच ''एमयूएफजी इन्टाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड'' यांच्याकडे वर नमूद केलेल्या उल्लेखानुसार आवश्यक कागदपत्रे पुढे करावीत.

सूचना याद्वारा देण्यात येते की, भागधारकांकडून वैध दाव्याची स्वीकृती न झाल्यास, कंपनी निर्धारित प्रक्रियेचे अनुसरण करून उक्त नियमांच्या आवश्यकतेच्या अनुसार कोणतीही पुढील सूचना न देता ''आयईपीएफ अकाऊंट''मध्ये उक्त इक्विटी भागांचे स्थानांतरण करील.

संबंधित भागधारकांनी नोंद घ्यावी की, एकदा का इक्विटी भागांचे ''आयईपीएफ ऑथोरिटी''च्या डिमॅट अकाऊंटमध्ये स्थानांतरण झाल्यास, उक्त नियमांच्या अनुसार ''आयईपीएफ''कडे स्थानांतरण झालेले इक्विटी भाग आणि दावा न केलेल्या लाभांश रकमेबाबत कंपनीच्या विरोधात कोणताही दावा करता येणार नाही.

कृपया नोंद घ्यावी की, सदर स्थानांतरणानंतर, भागधारक ''आयईपीएफ''कडून दावा न केलेल्या लाभांशासह उक्त इक्विटी भागांस दावा करू शकतील, त्याकरिता सविस्तर तपशील www.iepf.gov.in यावर उपलब्ध आहे.

भागधारकांनी याअधिक नोंद घ्यावी की, वेबसाइटवर कंपनीद्वारा अपलोड केलेला तपशील नियमांच्या अनुपालनार्थ ''आयईपीएफ''कडे भागांच्या स्थानांतरणासंबंधित पुरेशी सूचना मानण्यात येईल.

या प्रकरणावरील कोणतीही माहिती/ स्पष्टिकरणे याकरिता, संबंधित भागधारक/ दावेदार investor.relations@godrejcp.com यावर कंपनीला किंवा आरटीए, ''एमयूएफजी इन्टाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड'' (पूर्वीची लिंक इन्टाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड), सी-१०१, एम्बॅस्सी २४७, एलबीएस मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई- ४०००८३, टेलि.: +९१ ०२२- ४९१८६२७०, ईमेल: investor.helpdesk@in.mpms.mufg.com येथे लेखी स्वरूपात कळवू शकतील.

गोदरेज कन्झ्युमर प्रोडक्ट्स लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/-
तेजल जरीवाला
कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी
(एफसीएस ९८१७)

दिनांक: २१ मे, २०२६
स्थळ: मुंबई



बँक ऑफ महाराष्ट्र Bank of Maharashtra भारत सरकार का उद्यम एक परिवार एक बैंक

**बँक ऑफ महाराष्ट्र**
नवीन कॉर्पोरेट कार्यालय, मॉन्ट क्लेयर बिल्डींग, 134/1, बाणेर-पाषाण लिंक रोड, बाणेर, पुणे - 411021.
**फोन :** 020-71658261

**प्रस्तावासाठी विनंती (आरएफपी)**

बँक ऑफ महाराष्ट्र "**बँकेच्या (संपूर्ण भारतातील) शाखा/कार्यालयांमध्ये भौतिक सुरक्षा उपकरणे (फिजिकल सिक्युरिटी इक्विपमेंटस् म्हणजेच रोख रक्कम, तिजोरी, सोन्यासाठी तिजोरी, स्ट्राँग रुम दरवाजे, सेफ कम सेफ डिपॉझिट लॉकर कॅबिनेटस्) यांचा पुरवठा करणे व ती बसवून देणे या कामाचा दर करार करण्यासाठी मूळ उपकरणे उत्पादक (ओइएम्) यांच्याकडून**" मोहोरबंद निविदा आमंत्रित करत आहे. संभाव्य प्रस्तावक आरएफपीचे निविदा प्रपत्र बँकेची वेबसाईट **www.bankofmaharashtra.bank.in/tenders** वरून डाऊनलोड करून घेऊ शकतात.
आरएफपी सादर करण्याची अंतिम तारीख **दि. 12.06.2026, दु. 03.00 पर्यंत आहे.** तांत्रिक निविदा **दि. 12.06.2026 सायं. 04.00 वा.** उघडण्यात येतील आणि प्रस्तावकांना त्यासाठी उपस्थित राहण्याची विनंती करण्यात येत आहे. (संबंधित तपशील आरएफपी मध्ये नमदू केला आहे.)
वरील निविदेसंदर्भातील इतर परिशिष्ट / शुद्धीपत्रक / विस्तारीत तारखा / स्पष्टीकरण / प्रस्तावकांच्या शंकांसंदर्भातील निरसन, हे सर्व फक्त बँकेची वेबसाईट **www.bankofmaharashtra.bank.in/tenders** वर पोस्ट करण्यात येईल आणि यासंदर्भात कोणतीही स्वतंत्र अधिसूचना वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येणार नाही.

दिनांक : 21.05.2026

सहाय्यक महाप्रबंधक (सिव्हील)
निगमित सेवा विभाग



Trejhara

## Trejhara Solutions Limited

**CIN:** L72900MH2017PLC292340
**Regd. Office:** Unit no. 601, Sigma IT Park, Plot no. R-203, R-204 T.T.C. Industrial Estate, Rabale, Navi Mumbai - 400701.
**Phone:** +91-22-4040-8080, **Fax:** +91-22-4040-8081, **Email:** investor@trejhara.com; **Website:** www.trejhara.com

**AUDITED CONSOLIDATED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND YEAR ENDED 31ST MARCH 2026**

₹ in lakhs

| Sr. No. | Particulars | Quarter Ended | | | Year Ended | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 31-Mar-26 | 31-Dec-25 | 31-Mar-25 | 31-Mar-26 | 31-Mar-25 |
| | | Audited | Unaudited | Audited | Audited | Audited |
| 1 | Total Income from Operations | 4,186.75 | 3,381.49 | 3,923.76 | 14,224.86 | 11,575.39 |
| 2 | Net Profit/(Loss) for the period (before Tax, Exceptional items) | 319.44 | 190.27 | 206.32 | 1,101.29 | 662.87 |
| 3 | Net Profit/ (Loss) for the period before tax (after Exceptional items) | 319.44 | 152.30 | 206.32 | 1,063.32 | 662.87 |
| 4 | Net Profit/ (Loss) for the period after tax (after Exceptional items) | 321.97 | 121.01 | 86.23 | 867.07 | 424.09 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit/ (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 435.11 | 170.32 | 75.15 | 1,128.02 | 414.20 |
| 6 | Equity Share Capital | 2,411.67 | 2,350.56 | 2,350.56 | 2,411.67 | 2,350.56 |
| 7 | Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year | | | | 27,343.27 | 21,246.23 |
| 8 | Earnings per equity share (for Continuing and Discontinuing Operations) | | | | | |
| | - Basic (₹) | 1.35 | 0.51 | 0.36 | 3.68 | 1.80 |
| | - Diluted (₹) | 1.35 | 0.51 | 0.36 | 3.68 | 1.80 |

**Key numbers of Standalone Financial Results** ₹ in lakhs

| Sr. No. | Particulars | Quarter Ended | | | Year Ended | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 31-Mar-26 | 31-Dec-25 | 31-Mar-25 | 31-Mar-26 | 31-Mar-25 |
| | | Audited | Unaudited | Audited | Audited | Audited |
| 1 | Turnover | 2,793.63 | 2,867.04 | 3,392.47 | 11,654.47 | 10,135.55 |
| 2 | Profit/ (Loss) before tax | 925.32 | 215.45 | 261.73 | 1,655.84 | 561.55 |
| 3 | Profit/ (Loss) after tax | 930.54 | 198.22 | 191.32 | 1,502.09 | 390.00 |

a) The above is an extract of the detailed format of Statement of Audited Consolidated Financial Results for the Quarter and Year ended 31st March 2026 filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the quarter ended financial results are available on the websites of the Stock Exchange(s) and Company's website viz. www.trejhara.com.
b) Figures for previous period / year have been regrouped / reclassified, wherever necessary to make them comparable with those of the current quarter.
c) Exceptional and/or Extraordinary items adjusted in the Statement of Profit and Loss in accordance with Ind-AS Rules / AS Rules, whichever is applicable.

Place : Navi Mumbai
Date : 21-05-2026

For Trejhara Solutions Limited
sd/-
Amit Sheth
Chairman & Director
DIN - 00122623

Adfactors 91/26



protean

### प्रोटीयन ई-गव्ह टेक्नॉलॉजीज लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय :** १ ला मजला, टाइम्स टॉवर, कमला मिल्स कंपाऊंड, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई - ४०० ०१३
**सीआईएन :** L72900MH1995PLC095642 | **फोन:** +९१ २२ ४०९० ४२४२ | **ई-मेल :** cs@proteantech.in | **संकेत स्थळ :** www.proteantech.in

**३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षाच्या कालावधी करिता लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षाचे विवरण**

(रु. कोटी मध्ये इपीएस वगळता)

| अनु. क्र. | तपशील | स्वतंत्र | | | | | एकत्रित | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संपलेली तिमाही | | | संपलेले वर्ष | | संपलेली तिमाही | | | संपलेले वर्ष | |
| | | ३१मार्च २०२६ लेखापरिक्षित | ३१डिसेंबर २०२५ अलेखापरिक्षित | ३१मार्च २०२५ लेखापरिक्षित | ३१ मार्च २०२६ लेखापरिक्षित | ३१ मार्च २०२५ लेखापरिक्षित | ३१ मार्च २०२६ लेखापरिक्षित | ३१ डिसेंबर २०२५ अलेखापरिक्षित | ३१ मार्च २०२५ लेखापरिक्षित | ३१ मार्च २०२६ लेखापरिक्षित | ३१ मार्च २०२५ लेखापरिक्षित |
| १ | परिचलनातून एकूण उत्पन्न | ३०८.५५ | २२८.४० | २२३.७२ | ९९६.४३ | ८४१.३७ | ३०७.५४ | २२८.८७ | २२२.१५ | ९९७.७५ | ८४०.७० |
| २ | कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (कर पूर्वी अपवादात्मक आणि/ किंवा असाधारण बाबी ) | २६.२४ | ३२.६६ | २४.२६ | १२८.५५ | ११८.५५ | ३७.१६ | ३३.३७ | २५.२४ | १३४.९४ | ११८.४३ |
| ३ | कर पूर्वीच्या कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा असाधारण बाबी पश्च्यात) | २५.४९ | २८.७१ | २४.२६ | १२३.८५ | ११८.५५ | ३६.४१ | २९.४२ | २५.२४ | १३०.२४ | ११८.४३ |
| ४ | कर पश्च्यात च्या कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा असाधारण बाबी पश्चात) | १९.९६ | २१.६६ | १९.४२ | ९४.३२ | ९२.५८ | ३०.३८ | २२.५० | २०.४० | १००.५९ | ९२.४६ |
| ५ | कालावधीसाठी एकूण व्यापक उत्पन्न [सर्वसमावेशक नफा/ (तोटा) (करपश्च्यात) कालावधीसाठी आणि इतर सर्वसमावेशक उत्पन (करपश्च्यात)] | २३.९३ | २१.६६ | १६.२६ | ९८.२९ | ९१.२० | ३४.३० | २२.५० | १७.२४ | १०४.५१ | ९१.०८ |
| ६ | भरणा केलेले समभाग भांडवल ( रु. १०/ दर्शनी मुल्य असलेले प्रति समभाग ) | ४०.६२ | ४०.६२ | ४०.५५ | ४०.६२ | ४०.५५ | ४०.६२ | ४०.६२ | ४०.५५ | ४०.६२ | ४०.५५ |
| ७ | राखीव ( पुनर्मुल्यांकन राखीव वगळून) मागील वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदात दाखवल्याप्रमाणे | - | - | - | १,०३६.३५ | ९६२.९६ | - | - | - | १,०३६.७३ | ९५८.२३ |
| ८ | प्रति समभाग प्राप्ती (असाधारण बाबी पश्च्यात)(प्रत्येकी रु. १०/-) (संपलेले वर्ष वगळता वार्षिकृत नाही) | | | | | | | | | | |
| | मूलभूत : | ४.९२ | ५.३४ | ५.२० | २३.२४ | २२.८६ | ७.४९ | ५.५५ | ५.०४ | २४.७९ | २२.८३ |
| | सौम्यिकृत: | ४.९० | ५.३१ | ५.१६ | २३.१६ | २२.६८ | ७.४६ | ५.५२ | ५.०० | २४.७० | २२.६५ |

टिप :
१) वरील विवरण हे सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस) रेग्युलेशन, २०१५च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंज कडे दाखल करण्यात आलेल्या मार्च ३१, २०२६ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षाच्या कालावधी करीताचा वित्तीय निष्कर्षाच्या विस्तृत प्रारुपाचा सारांश आहे. सदर वित्तीय निष्कर्षाची संपूर्ण प्रारुप बीएसई ची वेबसाईटस www.bseindia.com आणि एनएसई ची वेबसाईटस www.nseindia.com आणि तसेच कंपनीची वेबसाइट www.proteantech.in वरही उपलब्ध आहे.
२) मार्च ३१, २०२६ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षाच्या कालावधी करीताचा उक्त वित्तीय निष्कर्षाचे लेखापरीक्षण समितीने आणि संचालक मंडळाने त्यांच्या मे २०, २०२६ रोजी झालेल्या सभेत त्यांनी पुनरावलोकन केलेले आहे.
३) मार्च ३१, २०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी मंडळाने प्रति इक्विटी शेअर्स १० रुपये दर्शनी मूल्याच्या (म्हणजे १००%) अंतिम लाभांश देण्याची शिफारस केली आहे.

स्थळ : मुंबई
दिनांक : मे २०, २०२६

प्रोटीयन ई-गव्ह टेक्नॉलॉजीज लिमिटेड च्या वतीने आणि करिता
सही/ -
ईश्वरन व्यंकटेश्वरन
पूर्णवेळ संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी
डीआयएन : ०८०५५७२८